महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी
पहिला मजला ,एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर,
३ ,महापालिका मार्ग ,धोबी तलाव, मुंबई - ४००००१
ईमेल: ceo@mssds.in
भ्रमणध्वनी क्र. ०२२-२२६२५६५१/५३

जा.क्र. MSSDS/Skill Policy/२०२६/ १९३
दि. १२/०३/२०२६

# जाहीर सूचना

**विषय: राज्याच्या प्रस्तावित कौशल्य धोरणाच्या मसुद्याबाबत सूचना व हरकती मागविण्याबाबत.**

संदर्भ: दि. १८.०२.२०२६ रोजीची जाहीर सूचना

राज्यातील कौशल्य विषयक प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी आणखी प्रभावी कालानुरुप, कालसुसंगत व्हावी आणि विविध विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विषयक कार्यक्रमांमधील द्वीरुक्ती टाळण्यासाठी राज्याचे कौशल्य धोरण तयार करण्याचे काम सुरु आहे. सदर कौशल्य धोरणाचा प्रारूप मसुदा तयार करण्यात आला आहे. या धोरणामध्ये रोजगारक्षमतेत वाढ, उद्योग-सहकार्य, तसेच उदयोन्मुख क्षेत्रांतील कौशल्य गरजा पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे.

सदर धोरण सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टीने आणि व्यापक सल्लामसलतीच्या उद्देशाने खालील सर्व सहभागधारकांकडून (उदा. उद्योग संघटना व नियोक्ता, प्रशिक्षण प्रदाते व प्रशिक्षण संस्था, सेक्टर स्किल कौन्सिल्स, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था, विषयतज्ज्ञ व संशोधक, विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी व सर्वसामान्य नागरिक, इतर सहभागधारक इत्यादी) सूचना, हरकती व अभिप्राय मागविण्यात येत आहेत.

सदर मसुदा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या पुढील अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे: https://kaushalya.mahaswayam.gov.in. त्याबाबत काही सूचना व हरकती असल्यास विहित नमुन्यात लेखी स्वरूपात mhskillpolicy@mssds.in या ई-मेलआयडीवर सादर कराव्यात. सूचना/हरकती सादर करण्याची सुधारित अंतिम तारीख दि. २०.०३.२०२६ आहे. निर्धारित कालमर्यादेत प्राप्त झालेल्या सर्व सूचना व हरकतींचा धोरण अंतिम करताना विचार करण्यात येईल. कोणतीही सूचना स्वीकारणे किंवा कारण नमूद न करता नाकारणे, ही बाब या कार्यालयाच्या अखत्यारित राहील.

(आनंद माळी)
अति. मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी
तथा सदस्य सचिव,
कौशल्य धोरण मसुदा समिती